# कोल्हापूर हे सहकारी चळवळीचे मुख्य केंद्र : डॉ. त्रिपाठी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर हे भारताच्या सहकारी चळवळीचे महत्त्वाचे केंद्र असून, येथील सहकारी चळवळीच्या गुणवैशिष्ट्यांचा आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी अभ्यास करावा, असे आवाहन पुणे येथील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था (वाम्निकॉम) व सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग इन ॲग्रिकल्चर बँकिंग (सिक्टॅब) संस्थेचे संचालक डॉ. के. के. त्रिपाठी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण स्कूल फॉर रुरल डेव्हलपमेंट, केंद्रीय कृषी कल्याण विभाग, वाम्निकॉम व सिक्टॅब यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारविषयक आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासकांसाठी 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम'. आयोजित केला आहे. या उपक्रमाचा प्रारंभ मंगळवारी ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपात झाला. त्यावेळी पुणे येथून डॉ. त्रिपाठी बोलत होते. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. चेतन गळगे यांनी स्वागत केले. डॉ. वैशाली भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. त्रिपाठी म्हणाले, वाम्निकॉम आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या दरम्यान झालेल्या सामंजस्य करारांतर्गत लगेचच हा एक महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय उपक्रम होतो आहे.

या उपक्रमात नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका या देशांतील अभ्यासक सहभागी झाले आहेत. कोल्हापूर हे भारताच्या सहकारी चळवळीच्या विकासाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू असून, शिवाजी विद्यापीठ हे त्याचे अभ्यासकेंद्र आहे. या भेटीचा अभ्यासकांनी पुरेपूर लाभ करून घ्यावा. यावेळी सिक्टॅबचे सल्लागार डॉ. डी. रवी, वाम्निकॉमचे डॉ. यशवंत पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपट्यास पाणी वाहून उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.

यावेळी कार्यक्रमास डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह नेपाळ, बांगलादेश या देशांतील अभ्यासक प्रत्यक्ष उपस्थित होते, तर ऑनलाईन स्वरूपात नेपाळच्या नील को-ऑपरेटिव्ह फेडरेशनच्या चित्रा थम्सुहांग, श्रीलंकेच्या राष्ट्रीय सहकारी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. असंका थिलंगरत्ने, डॉ. गणेश भाड, डॉ. जयमोहन नायर, डॉ. कल्पिता सरकार, बांगलादेशहून मोहम्मद मुर्शदुल इस्लाम आदी उपस्थित होते.

## एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्रामविषयी

श्रीलंका नेपाळ, भूतान, बांगलादेश, मालदिव आदी भारताच्या शेजारी राष्ट्रांसमवेत सकारात्मक सहकार्य संबंध वृद्धिंगत व्हावेत, यासाठी केंद्रीय कृषी विभाग, वाम्निकॉम, सिक्टॅब आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम ऑन को-ऑपरेटिव्ह बिझनेस मॉडेल हा उपक्रम दि. २ ते ५ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत उपरोक्त देशांमधील अभ्यासक, प्रतिनिधी सहभागी झालेले असून, कोल्हापूर विभागातील सहकारी चळवळीचा प्रत्यक्ष काही प्रकल्पांना, उद्योग-व्यवसायांना भेट देऊन अभ्यास करणार आहेत.

# कोल्हापूरचा सहकार जगभर पोहचावा

## कुलगुरू डॉ. शिर्के; 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम'मध्ये विविध देशांतील प्रतिनिधींचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : येथे सर्वच क्षेत्रांत सहकाराने मोठी क्रांती घडवून आणली. पशु व दुग्धविकास, ग्रामीण विकास, वस्त्रोद्योग, ग्राहक संस्था, पतसंस्था, साखर कारखानदारी अशी अनेक क्षेत्रे आहेत. येथील सशक्त सहकार चळवळ विभागामध्ये केवळ आर्थिक क्रांतीच नव्हे, तर सहकार सामाजिक विकासाचे महत्त्वाचे साधन बनले आहे. कोल्हापुरातील सहकार चळवळ जगभर पोहचावी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. त्यांच्या उपस्थितीमध्ये आज 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम'चे उद्घाटन करण्यात आले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम'मध्ये सहभागी प्रतिनिधी.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण स्कूल फॉर रुरल डेव्हलपमेंट आणि केंद्रीय कृषी व कृषक कल्याण विभाग, वाम्निकॉम व सिक्टॅबतर्फे सहकारविषयक व्यावसायिक प्रतिमानांचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासकांसाठी 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम' आयोजित केला आहे. याचा प्रारंभ आज ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात झाला.

पुणे येथून वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. के. के. त्रिपाठी सहभागी झाले होते. डॉ. वैशाली भोसले यांनी प्रास्ताविक केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सहकारविषयक जाणिवा वृद्धिंगत करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्यासाठी हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. कोल्हापूर विभागात जवळपास सर्वच क्षेत्रांत सहकाराने मोठी क्रांती घडवून आणली आहे. सहकार हे येथील सामाजिक विकासाचे महत्त्वाचे साधन बनले आहे. त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.' डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह नेपाळ, बांगलादेश या देशांतील अभ्यासक प्रत्यक्ष उपस्थित होते.

ऑनलाईन स्वरुपात नेपाळच्या नील को-ऑपरेटिव्ह फेडरेशनच्या चित्रा थम्सुहांग, श्रीलंकेच्या राष्ट्रीय सहकारी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. असंका थिलंगरत्ने, डॉ. गणेश भाड, डॉ. जयमोहन नायर, डॉ. कल्पिता सरकार, बांगलादेशहून मोहम्मद मुर्शदुल इस्लाम आदी उपस्थित होते.

### एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम

श्रीलंका, नेपाळ, भूतान, बांगलादेश, मालदीव आदी भारताच्या शेजारी राष्ट्रांसमवेत सकारात्मक सहकार्य संबंध वृद्धिंगत व्हावेत, यासाठी केंद्रीय कृषी विभाग, वाम्निकॉम, सिक्टॅब आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम ऑन को-ऑपरेटिव्ह बिझनेस मॉडेल हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार (ता.५) पर्यंत हा उपक्रम चालणार असून या अंतर्गत उपरोक्त देशांमधील अभ्यासक, प्रतिनिधी कोल्हापूर विभागातील सहकारी चळवळीचा प्रत्यक्ष काही प्रकल्पांना, उद्योग-व्यवसायांना भेट देऊन अभ्यास करणार आहेत.

# कोल्हापूर सहकारी चळवळीचे महत्त्वाचे केंद्र

## डॉ. के. के. त्रिपाठी; आंतरराष्ट्रीय एक्स्पोजर व्हिजीट उपक्रमास विद्यापीठात प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर हे भारताच्या सहकारी चळवळीचे महत्त्वाचे केंद्र आहे. येथील सहकारी चळवळीच्या गुण वैशिष्ट्यांचा आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी अभ्यास करावा, असे आवाहन पुणे येथील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेचे डॉ. के. के. त्रिपाठी (आय. ई.एस.) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण स्कूल फॉर रुरल डेव्हलपमेंट, केंद्रीय कृषी व कृषक कल्याण विभाग, वाम्निकॉम व सिक्टॅब यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारविषयक व्यावसायिक प्रतिमानांचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासकांसाठी 'एक्स्पोजर व्हिजीट प्रोग्राम' आयोजित केला आहे. उपक्रमाचा प्रारंभ मंगळवारी ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपात झाला. यावेळी पुणे येथून डॉ. त्रिपाठी बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. त्रिपाठी म्हणाले, कोल्हापूर भारताच्या सहकारी चळवळीच्या विकासाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू असून, शिवाजी विद्यापीठ हे त्याचे अभ्यासकेंद्र आहे. आपापल्या देशांमध्ये प्रतिनिधींनी सहकार चळवळीचा विकास व विस्तार करावा. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आर्थिक लाभापेक्षा सहकारी चळवळीमुळे झालेले शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, महिलांचे सबलीकरण, आदी सामाजिक लाभ महत्त्वाचे आहेत. त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

सिक्टॅबचे सल्लागार डॉ. डी. रवी, वाम्निकॉमचे डॉ. यशवंत पाटील यांनी मनोगते व्यक्त केले. चेतन गळगे यांनी स्वागत केले. डॉ. वैशाली भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. ए.एम. गुरव यांच्यासह नेपाळ, बांगलादेशातील अभ्यासक प्रत्यक्ष उपस्थित होते. ऑनलाईन स्वरूपात नेपाळच्या चित्रा थम्सुहांग, श्रीलंकेच्या डॉ. असंका थिलंगरत्ने, डॉ. कल्पिता सरकार, बांगलादेशहून मोहम्मद मुर्शदुल इस्लाम उपस्थित होते.

# भारतीय सहकार चळवळीचे कोल्हापूर केंद्र

## पुण्यातील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेचे डॉ. त्रिपाठी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोल्हापूर हे भारताच्या सहकारी चळवळीचे महत्त्वाचे केंद्र असून येथील सहकारी चळवळीच्या गुणवैशिष्ट्यांचा आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी अभ्यास करावा, असे आवाहन पुणे येथील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था (वाम्निकॉम) व सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग इन अॅग्रीकल्चर बँकिंग (सिक्टॅब) संस्थेचे संचालक डॉ. के. के. त्रिपाठी (आय.ई.एस.) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण स्कूल फॉर रुरल डेव्हलपमेंट आणि केंद्रीय कृषी व कृषक कल्याण विभाग, 'वाम्निकॉम व सिक्टॅब' यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारविषयक अभ्यास करण्यासाठी 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम' उपक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. डी. रवी.**

डॉ. त्रिपाठी म्हणाले, कोल्हापुरच्या सहकार चळवळीचे शिवाजी विद्यापीठ हे अभ्यासकेंद्र आहे. या उपक्रमात नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका या देशांतील अभ्यासक सहभागी झाले आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, पशु व दुग्धविकास, ग्रामीण विकास, वस्त्रोद्योग, ग्राहक संस्था, पतसंस्था, साखर कारखानदारी क्षेत्रात कोल्हापूर विभागाने क्रांती घडवली आहे. सहकाराने स्वतःबरोबरच परिसराचा शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय विकास केला आहे. सिक्टॅबचे सल्लागार डॉ. डी. रवी, वाम्निकॉमचे डॉ. यशवंत पाटील यांनी मनोगते व्यक्त केले. चेतन गळगे यांनी स्वागत केले. डॉ. वैशाली भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह नेपाळ, बांगलादेश येथील अभ्यासक प्रत्यक्ष उपस्थित होते. नेपाळच्या नील को–ऑपरेटिव्ह फेडरेशनच्या चित्रा थम्सुहांग, श्रीलंकेच्या राष्ट्रीय सहकारी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. असंका थिलंगरत्ने, डॉ. गणेश भाड, डॉ. जयमोहन नायर, डॉ. कल्पिता सरकार, बांगलादेशहून मोहम्मद मुर्शदुल इस्लाम आदींची ऑनलाईन उपस्थिती होती.

# राज्यांतील महाविद्यालयांबाबत दोन दिवसांत निर्णय शक्य

## विद्यापीठ स्तरावर आढावा घेण्याचे काम अंतिम टप्प्यात

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महाविद्यालये सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यपाल तथा कुलपतींनी सर्व कुलगुरूंसोबत चर्चा केल्यानंतर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याकडे सर्व कुलगुरूंची व्हीसीद्वारे बैठक पार पडली. विद्यापीठ स्तरावर आढावा घेतला जात असून महाविद्यालयांचा श्रीगणेशा येत्या दोन दिवसांत होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने निकषांचे पालन करून महाविद्यालये सुरू करण्याची सूचना केली होती. याबाबत शनिवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडेही कुलगुरूंची बैठक झाली. त्यावेळी महाविद्यालये सुरू करण्याबाबत चर्चा झाली होती. यानंतर सोमवारी सामंत यांनी एक बैठक बोलावून कुलगुरूंच्या सूचना ऐकल्या. या सूचना आता आपत्ती व्यवस्थापन समितीसमोर ठेवल्या असून यावर अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

कुलगुरूंनी महाविद्यालये सुरू करण्याबाबत अनुकूलता दर्शविली. ही सर्व महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात यावी, अशी सूचनाही यावेळी करण्यात आली. महाविद्यालये सुरु होण्याची गरजही कुलगुरुंनी व्यक्त केली आहे.

विद्यापीठातील वसतिगृहात सोशल डिस्टन्सिंग पाळायचे असेल तर एका खोलीत आता चार ऐवजी दोनच विद्यार्थ्यांची व्यवस्था करणे शक्य होणार आहे. यामुळे निवास व्यवस्थेची अडचण होऊ शकते, अशी शंकाही काही विद्यापीठांनी व्यक्त केल्याचे समजते.

### अंतिम परीक्षेचा संभ्रम कायम...

उन्हाळी सत्रात होणाऱ्या अंतिम वर्ष परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने घेण्यात याव्यात, अशी सूचना कुलगुरूंतर्फे देण्यात आल्या आहेत. यावर एकमत झालेले नाही. प्रत्येक विद्यापीठ स्वतंत्रपणे आपला निर्णय घेऊ शकेल, असेही यामध्ये स्पष्ट करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आंतरराष्ट्रीय 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम' या उपक्रमाची सुरुवात झाली. त्याच्या उद्घाटनप्रसंगी नेपाळ, श्रीलंका, बांगलादेशातील अभ्यासक, प्रतिनिधी उपस्थित होते.

# श्रीलंकेलाही कोल्हापूरच्या सहकार चळवळीची भुरळ

## प्रकल्पांना भेट देऊन प्रतिनिधी करणार अभ्यास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम'अंतर्गत कोल्हापूरच्या सहकारी चळवळीचा अभ्यास श्रीलंका, नेपाळ, भूतान, बांगलादेश, मालदीवमधील अभ्यासक, प्रतिनिधी करणार आहेत. त्यातील नेपाळसह आपल्या देशातील एकूण १८ प्रतिनिधी शिवाजी विद्यापीठात मंगळवारी दाखल झाले. या उपक्रमामध्ये ते काही सहकारी प्रकल्प, उद्योग-व्यवसायांना भेट देऊन अभ्यास करणार आहेत.

भारताच्या शेजारी राष्ट्रांसमवेत सकारात्मक सहकार्य संबंध वृद्धिंगत व्हावेत, यासाठी केंद्रीय कृषी विभाग, पुणे येथील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था (वाम्निकॉम), सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग इन ॲग्रिकल्चर बँकिंग (सिक्टॅब) संस्था आणि शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल फॉर रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम ऑन को-ऑपरेटिव्ह बिझनेस मॉडेल हा उपक्रम शुक्रवार (दि.५) पर्यंत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा प्रारंभ ऑनलाईन, ऑफलाईन पध्दतीने विद्यापीठात झाला. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर 'वाम्निकॉम'चे संचालक डॉ. के. के. त्रिपाठी प्रमुख उपस्थित होते.

कोल्हापूर हे भारताच्या सहकारी चळवळीचे महत्त्वाचे केंद्र आहे. येथील सहकारी चळवळीच्या गुणवैशिष्ट्यांचा आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी अभ्यास करावा, असे आवाहन डॉ. त्रिपाठी यांनी केले. सिक्टॅबचे सल्लागार डॉ. डी. रवी, वाम्निकॉमचे डॉ. यशवंत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, ए. एम. गुरव यांच्यासह नेपाळमधील तीन, तर पुणे, नागपूर, बंगलोर, त्रिवेंद्रम येथील १५ अभ्यासक उपस्थित होते. दरम्यान, चित्रा थम्सुहांग (नेपाळ), असंका थिलंगरत्ने, गणेश भाड, जयमोहन नायर, कल्पिता सरकार (श्रीलंका), मोहम्मद मुर्शदुल इस्लाम (बांगलादेश) हे ऑनलाईन सहभागी झाले.

### विविध बाजूंचा परिचय


या उपक्रमांतील सहभागी अभ्यासक, प्रतिनिधींना कोल्हापूरमधील सहकार चळवळीच्या विविध बाजूंचा परिचय करून दिला जाणार आहे. त्यांनी सहकार विषयक हे उपक्रम आपआपल्या देशात जाऊन राबवावेत. तेथील सर्वसामान्य नागरिकांचा सहकाराच्या बळावर विकास करावा, असा 'एक्स्पोजर व्हिजिट प्रोग्राम'चा उद्देश आहे.

# राज्यातील महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू

## ५० टक्के उपस्थिती ठेवण्याच्या सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** राज्यातील उच्च शिक्षण संस्था टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी झालेल्या कुलगुरूंच्या बैठकीत दिली. विशेष म्हणजे, सुरुवातीला ५० टक्के उपस्थितीत महाविद्यालये सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.



उदय सामंत यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी दूरचित्राद्वारे संवाद साधला. या वेळी कुलगुरूंनी राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याची मागणी केली असता त्यांनी ही माहिती दिली. सर्वच स्तरांतून वाढता दबाव बघता उदय सामंत यांनी टप्प्याटप्प्याने महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हे करताना सुरुवातीला ५० टक्के उपस्थिती ठेवणे अपेक्षित असून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्यास मज्जाव करू नये अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. याशिवाय वसतिगृह बंद असल्याने बाहेर शहरात असणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात येण्यासाठी कुठलेही बंधन टाकू नयेत, अशा सूचना या वेळी सामंत यांनी दिल्या.

## 'परीक्षांचा निर्णय विद्यापीठांनी घ्यावा'

विद्यापीठांच्या शैक्षणिक वर्षाला जुलैपासून सुरुवात झाली असून तिसऱ्या, पाचव्या व सातव्या सत्रांच्या परीक्षांचा अभ्यासक्रमही पूर्ण झाला आहे. त्यामुळे या परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर घ्यावा, त्या ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतींनी घेण्याचे नियोजन करावे, अशा सूचनाही उदय सामंत यांनी या बैठकीत दिल्या.

# सभी क्षेत्रों ने की बजट की सराहना

नवभारत न्यूज नेटवर्क

पुणे. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमन द्वारा पेश किए गए बजट पर पुणे के विभिन्न क्षेत्रों के अधिकतर विशेषज्ञों ने भूरि भूरि प्रशंसा की है. फिर चाहे व उद्योगपति हों, स्वास्थ्य सेवा से जुड़े लोग हों, शिक्षा जगत के लोग हों या फिर निर्माण व्यवसायी ने इस बजट को संतुलित व दूरदर्शी बताया.

## अतिरिक्त कर न लगना बड़ी राहत

स्वास्थ्य सुरक्षा व मूलभूत सुविधाओं में वृद्धि की गई है. कोरोना जैसी महामारी के साल में बजट में कोई अतिरिक्त कर न लगाना ही सबसे बड़ी राहत है. पेट्रोल व डीजल पर लगाए गए अतिरिक्त शुल्क से आम लोगों पर कोई विपरीत परिणाम नहीं होगा. क्योंकि उत्पादन शुल्क को कम कर नुकसान भरपाई की जाएगी. अफोर्डेबल घर व स्टार्टअप के लिए कर के लाभ में और एक साल की अवधि दे दी गई है. वरिष्ठ नागरिकों को अब कर नहीं भरना होगा. जो बहुत बड़ी राहत वाली खबर है.

- सीए आनंद जाखोटिया, कोषाध्यक्ष,
वेस्टर्न इंडिया रिजनल काउंसिल, आयसीएआय

## दीर्घकाल के लिए बेहतर बजट

दीर्घकाल का विचार करें तो यह बजट काफी बेहतर है. परंतु मौजूदा समय की बात करें तो यह बजट पूरक नहीं है. स्वास्थ्य केंद्रों का विस्तार गांव तक करने में मदद मिलेगी. मेट्रो का जाल बिछाने की दृष्टि से यह बजट सकारात्मक है. इस बजट से आयात-निर्यात को बढ़ावा मिलेगा.

- प्रा. डॉ. संजय चोरडिया, अध्यक्ष,
सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इनस्टिट्यूट, पुणे.

## सोने, चांदी के भाव में कमी आएगी

व्यापारियों की दृष्टि से यह बजट अधिक संतोषजनक नहीं. केंद्र सरकार द्वारा सोने व चांदी के सीमाशुल्क में कटौती करने से सोने, चांदी के भाव में कमी आएगी. परंतु, इंधन पर कृषि अधिभार लगाने से महंगाई बढने का खतरा बन गया है.

-फत्तेचंद रांका , पुणे व्यापारी महासंघ के अध्यक्ष

## उच्च शिक्षा के लिए बेहतर बजट

उच्च शिक्षा के क्षेत्र में अनुसंधान और कौशल विकास को बढ़ावा देने की दृष्टि से यह बजट काफी अच्छा है. नई शिक्षा नीति में निर्देशित बिंदुओं को प्रत्यक्ष में लाने के संदर्भ में यह एक महत्वपूर्ण पहल है. 15 हजार से अधिक स्कूलों की गुणवत्ता में सुधार लाने तथा 100 सैन्य स्कूल शुरू करने का जो संकल्प बजट में किया गया है वह काफी अहम है. उच्च शिक्षा आयोग की स्थापना करने के संदर्भ में इस बजट में आश्वासन दिया गया है, यह एक अच्छी पहल है. विदेशी शिक्षा संस्थानों के सहयोग से दोहरी डिग्री, सहायक डिग्री विभिन्न तरह के पाठ्यक्रम चलाने की मंसा इस बजट में व्यक्त की गई है. यूएई, जापान जैसे देशों के साथ कौशल विकास के लिए सहयोग में बढ़ोतरी भारतीय युवाओं के लिए लाभकारी फैसला है.

-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु, शिवाजी
विश्वविद्यालय, कोल्हापुर

## होटल उद्योग पर अन्याय

जहां तक होटल उद्योग की बात है तो सरकार ने उनके साथ अन्याय किया है. भोजन पर 18 % जीएसटी भरना पड़ रहा है. कोरोना काल में होटल व्यवसाय पूर्ण रूप से टूट गया है. इसलिए उम्मीद थी कि सरकार होटल उद्योग को बढावा देगी. पर ऐसा कुछ नहीं हुआ. इससे इस क्षेत्र में निराशा है.

-मधुकर बाबर
फेडरेशन ऑफ होटल के
उपाध्यक्ष

## एजुकेशन डेस्टिनेशन बनेगा भारत

भारतीय अर्थव्यवस्था को पटरी पर लाने के लिए जो भी कदम उठाए गए हैं, उसका स्वागत है. इसमें बुनियादी ढांचे, स्वास्थ्य व कृषि सहित सभी क्षेत्रों पर जोर दिया गया है. जहां तक शिक्षा क्षेत्र की बात है तो FDI लाना बड़ा कदम है. इससे यह क्षेत्र काफी तेजी से उठेगा. इससे यहां पर भी वैश्विक स्तर की शिक्षा को बढावा मिलेगा. IND-SAT के जरिए एशिया व अफ्रीकी विद्यार्थियों को भारत में शिक्षा के लिए आमंत्रण बेहतर कदम है. इससे भारत एजुकेशन डेस्टिनेशन के तौर पर उभरेगा.

-राहुल कराड, मैनेजिंग ट्रस्टी व
कार्यकारी अध्यक्ष माईर्स एमआईटी ग्रुप

## भारत का भविष्य ... प्रोत्साहन

रोजगार, उद्योग को बढावा ... इसमें किए गए हैं. इसके स... छूट दिए जाने से युवाओं को उद्योग व... क्षेत्र के लिए भारी घोषणाएं की गई हैं... खड़ा करने पर जोर दिया गया है. को... करने के लिए उठाए गए कदम स्वाग... युवाओं को प्रोत्साहन देनेवाला बजट...

- कल्याण जाधव,,

## सकारात्मक बजट

अस्थिर समय में निवेशकों व अन्य सभी भागीदारों को स्थैर्य देने के लिए सरकार ने सकारात्मक कदम उठाए हैं. भारत के आर्थिक विकास को सक्षम बनाने के लिए सभी संबंधित क्षेत्रों के लिए सूक्ष्म से सूक्ष्म स्तर पर वितरण करने का प्रयास वित्त मंत्री ... इस बजट में किया है.

- प्रकाश छाबरि...
चेयरमेन फिनोलेक्स इंडस्ट्री...

## अर्थव्यवस्था को गति दे... वाला बजट

कोरोना संकट में अर्थव्यव... की स्थिति को देखते हुए वित्तमंत्री ने उचित उपाय करते हुए अर्थव्यवस्था को गति देने का प्रयास कि... है. इसका प्रतिबिंब शेयर बाजार में दिखा... है ,जो उत्साहपूर्ण है. नेशनल फेसलेस आईटी ट्रिब्यूनल से आयकर के दावों के संदर्भ में पारदर्शिता आएगी. प्रवासी भारतीयों को दोहरा कर ना होने से देश में रहने की समय सीमा का लाभ गृहनिर्माण को होगा.

-कृष्णकुमार गोयल, अध्यक्ष तथा प्रबंधक
संचालक, कोहिनूर ग्रुप